CNR No.MHSI010006882017

## नियमित दिवाणी अपील क्र. १२०/२०१७ मधील निशाणी ४६ खालील आदेश

**(स्नेहलता भागवत – अपिलार्थी वि. चंद्रकांत ठाकर व. – उत्तरार्थी)**

प्रस्तुतचा अर्ज अर्जदार (अपिलार्थी क्र. १ब) यांनी अपिलार्थी– स्नेहलता सुधाकर भागवत यांचा मृत्यू दि. २८/११/२०२४ रोजी झाला असून, अर्जात नमूद अपिलार्थी क्र. १(अ) व १(ब) हे त्यांचे कायदेशीर वारस असल्यामुळे त्यांना प्रस्तुत अपिलाकामी सामील करून घेण्यास व तशी दुरूस्ती प्रस्तुत अपिलात करण्यास परवानगी मिळण्याकरीता दाखल केला आहे.

२. उत्तरार्थी यांनी त्यांच्या म्हणण्याव्दारे प्रस्तुत अर्जास तीव्र आक्षेप नोंदविला आहे.

३. युक्तिवाद ऐकला.

४. माझी निरीक्षणे पुढीलप्रमाणे आहेत.

५. अभिलेखावरील कागदांची यादी निशाणी ४८ सोबत सदरहू अपिलार्थी यांचे मृत्यू प्रमाणपत्र हजर करण्यात आलेले आहे. त्यामध्ये सदरहू अपिलार्थी यांचे नांव नमूद केलेले आहे. त्यामध्ये त्यांची मृत्यू दिनांक २८/११/२०२४ अशी नमूद आहे. प्रस्तुच्या अर्जामध्ये सदरहू अपिलार्थी यांच्या वारसांची नांवे दिलेली आहेत. त्यामुळे सदरचे वारस अभिलेखावर आणणे आवश्यक आहे. सबब आदेश.

### आदेश

१) अर्ज निशाणी ४६ मंजूर करण्यात येत आहे.

२) अर्जदार यांनी नियमानुसार विहीत कालावधीत अपिलात आवश्यक ती दुरूस्ती करावी.

सही/–

(डॉ सुधीर म देशपांडे)

प्रमुख जिल्हा न्यायाधीश

सिंधुदुर्ग–ओरोस

दिनांकः–२८/०४/२०२६

SUDHIIR MAHADEO DESHPANDE

Digitally signed by SUDHIIR MAHADEO DESHPANDE Date: 2026.04.28 15:11:26 +0530

All concerned to act upon digitally signed uploaded copy of this order, the printout of which can be verified from the official website of this court. In this regard attention of all concerned is invited to the authority of the Hon'ble High Court of Bombay (Bench at Aurangabad) ***Shital Krushna Dhake v. Krushna Dhake***, MANU/MH0285/2018.